Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277-5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA





Volume-VIII, Issue-IV
October - December - 2019
Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

Ajanta
Prakashan

Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | आदिवासी साहित्यातील बोलीभाषा व सांस्कृतिक दर्शन<br>**डॉ. रवींद्र मुरमाडे** | १-४ |
| २ | विदर्भाच्या राजकीय जनजागृतीत राष्ट्रसंतांच्या ग्रामगीतेचे योगदान<br>**प्रा. प्रफुल्ल आर. शेंडे** | ५-११ |
| ३ | वैदर्भीय मराठी कादंबरीकार प्रा. डॉ. विद्याधर बन्सोड यांच्या 'मुक्काम पोस्ट तेढा' कादंबरीचे मूल्यमापन<br>**प्रा. विद्या हिरामण देठे** | १२-१६ |
| ४ | 'वैकल्य' वैदर्भीय कादंबरी : एक आकलन<br>**प्रणाली खुशालराव कापसे** | १७-२२ |
| ५ | वैदर्भीय आदिवासी साहित्यातून प्रतिबिंबीत होणारा नक्षलवाद<br>**प्रा. मोक्षदा नाईक - मनोहर** | २३-२८ |
| ६ | अनुराधा पाटील यांची कविता<br>**प्रा. डॉ. बाबाराव मारोती ठावरी** | २९-३३ |
| ७ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीते मधील शिक्षक व विद्यार्थी यांची भूमिका<br>**प्रा. विकास सुरेश ढुमणे** | ३४-३८ |
| ८ | वैदर्भीय मराठी कादंबरी 'राघववेळ' : अभिव्यक्तिचा शोध<br>**प्रा. महेश गेडाम** | ३९-४७ |
| ९ | विदर्भातील निवडक लोकगीते : एक आकलन<br>**डॉ. नरेंद्र तु. आरेकर** | ४८-५२ |
| १० | विदर्भातील आदिवासी काव्यधारा<br>**प्रा. डॉ. गणेश एन. चुदरी** | ५३-५६ |
| ११ | वारकरी संप्रदाय आणि वैदर्भिय संत<br>**प्रा. चिन्नना मेंगाजी चालुरकर** | ५७-६३ |
| १२ | वैदर्भीय मराठी कादंबरी<br>**डॉ. जनार्दन काटकर** | ६४-६६ |
| १३ | वैदर्भीय काव्यप्रवाह<br>**डॉ. सुधाकर भुयार** | ६७-६९ |
| १४ | मराठी गझलेचा वैदर्भीय सम्राट : सुरेश भट<br>**डॉ. राजेश देशपांडे** | ७०-७३ |




Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# १२. वैदर्भीय मराठी कादंबरी

डॉ. जनार्दन काटकर
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.

अर्वाचीन मराठी साहित्यात सर्वाधिक लोकप्रिय ठरलेला वाङ:मयप्रकार म्हणून कादंबरीचा निर्देश करावा लागतो. या वाङ:मयप्रकारात अनेक साहित्यिकांनी योगदान दिले आहे. सुमारे दीडशे वर्षांनी परंपरा लाभलेला हा वाङ:मयप्रकार आज विविधांगाने विकसित झालेला आहे. अलिकडच्या काही वर्षामध्ये दलित, ग्रामीण, आदिवासी या साहित्यप्रवाहातून कादंबरी विकसित होत गेली आहे. आजपर्यंत चार मराठी साहित्यिकांना ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यापैकी दोन कादंबरीकार आहेत. वि.स. खांडेकर यांच्या 'ययाती' आणि भालचंद्र नेमाडे यांच्या 'हिंदू' या दोन कादंबऱ्यांचा गौरव ज्ञानपीठ पुरस्काराने झालेला आहे. दरवर्षी साहित्य अकादमीतर्फे प्रत्येक भाषेतील एका श्रेष्ठ कलाकृतीचा गौरव केला जातो. या कलाकृतीमध्येही मराठी कादंबरी या वाङ:मयप्रकाराला सर्वाधिक पुरस्कार लाभले आहेत. यावरून मराठी साहित्यातील कादंबरीचे स्थान अधोरेखित होते.

एकूण मराठी कादंबरीमध्ये वैदर्भीय मराठी कादंबरीने मोलाचे योगदान दिलेले आहे. अनेक वैदर्भीय कादंबरीकारांनी अत्यंत कसदार लेखन करून या वाङ:मयप्रकारावर आपला ठसा उमटवला आहे.

ग. त्र्य. माडखोलकर, उध्दव शेळके, मनोहर तल्हार, आशा बगे, नामदेव कांबळे, बाबाराम मुसळे, रविंद्र शोभणे, विस.स. जोग, शुभांगी भडभडे, सुरेश द्वादशीवार, पुरूषोत्तम बोरकर, एकनाथराव साळवे, यशवंत मनोहर, सदानंद देशमुख, मधुकर वाकोडे, श्शरश्चंद्र मुक्तिबोध, मधुकर केचे, विठ्ठल वाघ, प्रतिमा इंगोले, विजया ब्राम्हणकर इत्यादी वैदर्भीय कादंबरीकारांनी मराठी कादंबरीचे दालन समृध्द् केले आहे.

सर्वच वैदर्भीय कादंबऱ्यांमधून वैदर्भीय प्रदेश आणि वैदर्भीय संस्कृतीचे दर्शन साठोत्तरी मराठी कादंबरीमधून ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन घडते. वैदर्भीय कादंबरीदेखील याला अपवाद नाही. शेतकरी, दलीत, आदिवासी, स्त्रिया, तरूण, वृध्द् यांचे जीवन वैदर्भीय कादंबरीत चित्रित झालेले आहे. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण यामुळे आर्थिक धोरणात बदल झाला. त्याचा ग्रामीण जीवनावर मोठा परिणाम झाला. गावगाडा विस्कळीत झाला. गावातील बलुतेदारी बंद झाली. त्यामुळे अनेकांचे कामधंदे बुडाले. अशा लोकांनी शहराची वाट धरली. पक्षीय राजकारण गावापर्यंत पोहचले. ग्रामपंचायतीच्या निवडणुका चुरसीने लढविल्या जाऊ लागल्या. त्यामुळे गावात गट पडले, गावातील एकोपा संपला. एकत्र कुटुंबपध्द्तीचा ऱ्हास होऊन विभक्त कुटुंबपध्द्ती सुरू झाली. जमीनीचे तुकडे झाले त्यामुळे अनेक अल्पभूधारक बनले. अशातच निसर्ग बदलला आणि त्यामुळे शेती तोटयात गेली. गावात सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढू लागली. शेतकरी सावकारी पाशात अडकले आणि त्यातूनच शेतकरी आत्महत्यांचे सत्र सुरू झाले. महाराष्ट्रात सर्वाधिक



Govt. College of Arts & Science * Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Scanned with CamScanner

शेतकऱ्यांच्या आत्महत्या विदर्भातच झाल्या आहे. ग्रामीण जीवनातल्या या पडझडीचे वास्तव दर्शन वैदर्भीय कादंबरीतून घडते. गावात झालेले बदल वैदर्भीय कादंबरीने चित्रित केलेले आहे.

गावातील मुल्यव्यवस्था बदलत गेली. 'बळी तो कान पिळी' या न्यायाने धनवान हे गरीबानंवर अत्याचार करू लागले. अनितीचा वापर सुरू झाला आणि ऐकेकाळी गुण्यागोविंदाने, आनंदाने वागळणारा, सुखाने नांदणारा गाव बघता बघता उध्द्स्त झाला. त्यात नोकरशाही मुजोर झाली. त्यांनीही शेतकऱ्यांची जमेल तशी पिळवणूक केली. त्यामुळे बळीराजा हवालदिल झाला. या सर्व बदलांचे भेदक दर्शन वैदर्भीय कादंबरीमधून घडते. सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास' मधून शेतकरी जीवनाचे भिषण वास्तव समोर आले आहे. बाबाराव मुसळे यांच्या 'वारूळ' मधून बलुतेदारांच्या समस्यांना वाचा फोडली आहे तर एकनाथ साळव्यांच्या एनकाऊंटर' मधून आदिवासींचे भिषण जीवन चित्रित झाले आहे. सर्वच वैदर्भीय कादंबरीमधून ग्रमीण जीवनातील हे बदल टिपले असून तेथील लोकांच्या दु:खाला वाचा फोडली आहे.

वैदर्भीय कादंबरीकारांनी लिहिलेल्या अनेक कादंबऱ्या रसिक मान्य झालेल्या आहे. अनेक कादंबऱ्यांना सन्मानाचे पुरस्कार लाभलेले आहेत. ग. त्र्यं. माडखोलकर यांची 'चंदनवाडी' ही कादंबरी अनेक विद्यापिठांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट झालेली आहे. मनोहर तल्हार यांच्या 'माणूस' कादंबरीने रसिकांचे लक्ष वेधून घेतले आहे. उध्द्व श्शेळके यांची 'धग' ही कादंबरी एक उत्कृष्ट ग्रामीण कादंबरी म्हणून ठरलेली आहे. नामदेव कांबळे यांच्या 'राघववेळ' या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुररूस्कार लाभलेला आहे. सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास' या कादंबरीने देखील साहित्य अकादमी पुरस्कार मिळविला आहे. आशा बग यांच्या 'भूमी' या कादंबरीलाही साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला आहे. थोडक्यात वैदर्भीय कादंबरीने रसिकमान्यता आणि राजमान्यता मिळविली आहे. एकूण मराठी कादंबरी वाड:मयात वैदर्भीय कादंबरीने मोलाचे योगदान दिलेले आहे.

साठोत्तरी काळात मराठी साहित्यात दलित, ग्रामीण आणि आदिवासी हे तीन प्रवाह ठळकपणे उदयास आले. या तिनही साहित्यप्रकारात अनेक वैदर्भीय कादंबरीकारांनी आपले भरीव योगदान दिलेले आहे. ग्रामीण साहित्यात उद्धव शेळके, सदानंद देशमुख, पुरूषोत्तम बोरकर, रविंद्र शोभणे, मनोहर तल्हार, प्रतिमा इंगोले यांचे योगदान महत्वाचे ठरले आहे. दलीत साहित्यात नामदेव कांबळे, बाबाराव मुसळे यांनी दर्जेदार लेखन केले आहे. आदिवासी साहित्यात एकनाथ साळवे, सुरेश द्वादशीवार, मधुकर वाकोडे यांनी कसदार कादंबरी लेखन केलेले आहे. याशिवाय पौराणिक आणि चरित्रात्मक प्रकारातही वैदर्भीय कादंबरीकारांचे योगदान लक्षणिय आहे. यासंदर्भात मधूकर केचे, विठ्ठल वाघ, यशवंत मनोहर, शुभांगी भडभडे यांचा आवर्जुन उल्लेख करावा लागेल. त्यांनी लिहिलेल्या अनेक कादंबऱ्या रसिकमान्य झालेल्या आहेत. राजकीय स्वरूपाच्या कादंबरी लेखनातही वैदर्भीय कादंबरीकार मागे नाहीत यासंदर्भात रविंद्र शोभणे यांचे योगदान मोलाचे आहे.

कसदार कथानक हे वैदर्भीय कादंबरीचे महत्वाचे वैशिष्टये आहेत. यासंदर्भात ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या 'चंदनवाडी', सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास', उध्द्व शेळके यांच्या 'धग', मनोहर तल्हार यांच्या 'माणूस', रविंद्र शोभणे यांच्या 'कोंडी' इत्यादी कादंबऱ्या लक्षणिय ठरल्या आहेत. शेतकरी जीवनाचे वास्तव



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Scanned with CamScanner

दर्शन हे देखील वैदर्भीय कादंबरीचे ठळक वैशिष्टये आहे. या संदर्भात सदानंद देशमुख यांची 'बारोमास', रविंद्र शोभणे यांची 'पांढर', डॉ. रमेश अंभारे यांची 'पागोरा', बाबाराम मुसळे यांची 'हाल्या हाल्या दूधू दे', प्रतिमा इंगोले यांची 'बुढाई' या कादंबऱ्यांचा उल्लेख करावा लागेल. आदिवासी समाजाचे चित्रण हे देखील वैदर्भीय कादंबरीचे महत्वाचे वैशिष्टये मानावे लागेल. या संदर्भात सुरेश द्वादशीवार यांची 'हाकुमी', एकनाथ साळवी यांची 'एनकाऊंटर', मधुकर वाकोडे यांची 'झेल झपाट' या कादंबऱ्या लक्षणिय आहेत. दलीत समाजाचे भेदक दर्शन हे देखील वैदर्भीय कादंबरीचे अत्यंत महत्वाचे वैशिष्टये आहेत. यासंदर्भात नामदेव कांबळे यांची 'राधव वेळ', बाबाराम मुसळे यांची 'वारूळ' या कलाकृती महत्वाच्या आहेत. वैदर्भीय बोलीभाषेचा औचित्यपूर्ण वापर हे वैदर्भीय मराठी कादंबरीचे सर्वात महत्वाचे वैशिष्टये आहे कारण याच वैशिष्टयांमुळे या कादंबऱ्यांना वैदर्भीय हे विशेषण लाभले आहे. या संदर्भात पुरूषोत्तम बोरकर यांची 'मेड इन इंडिया', सदानंद देशमुख यांची 'बारोमास', बाबाराम मुसळे यांची 'वारूळ', प्रतिमा इंगोले यांची 'बुढाई' या कादंबऱ्या लक्षणीय आहेत. प्रभावी आणि संस्मरणीय व्यक्तीरेखा हे देखील वैदर्भीय मराठी कादंबरीचे एक खास वैशिष्टये मानावे लागेल. या संदर्भात ग. त्र्यं. माडखोलकरांची 'चंदणवाडी' (चंदन), उध्द्व शेळके यांची 'धग'(कौतिक), सदानंद देशमुख यांची 'बारोमास' (एकनाथ), पुरूषोत्तम बोरकर यांची 'मेड इन इंडिया' (पंजाबराव) या कादंबऱ्यांचा गौरवाने उल्लेख करावा लागेल.

थोडक्यात कसदार कथानक, प्रभावी व्यक्तिरेखा, आशयानुकूल भाषाशैली, दलीत, ग्रामीण, आदिवासी समाजाचे वास्तवदर्शन इत्यादी वैशिष्टयांनी वैदर्भीय मराठी कादंबरी ही एकूण मराठी कादंबरी वाङ:मयात लक्षवेधक ठरली आले. तीने आपले वेगळेपण जपले आहे आणि एकूण मराठी कादंबरीने वाङ:मयात अतिशय मोलाचे योगदान दिलेले आहे.

Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad



Scanned with CamScanner